ePaper

**पुणे घाणेरडे शहर! एपस्टीन फाईल्समध्ये धक्कादायक खुलासा!**



| वर्ष - 9 | अंक - 159 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 04 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

महेशदादा लांडगे मोठ्या भावासारखे; महापौर रवी लांडगे

## अमेरिकासोबत व्यापार करार : विरोधक आठ खासदारांचे निलंबन

# विरोधकांचा रागा; सत्ताधाऱ्यांचा त्रागा!

महाईन्यूज | नवी दिल्ली

**काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी लोकसभेत माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकातील उल्लेखावरून सत्ताधाऱ्यांना घाम फोडलेला असताना आज अमेरिकेबरोबर भारताने व्यापार करार केल्यावरून राहुल गांधींनी आवाज उठवला. या प्रश्नी राहुल गांधींचं समर्थन करणाऱ्या खासदारांनाच निलंबित करण्यात आलं आहे.**



### कृषी आणि डेअरी क्षेत्र सुरक्षित

गोयल यांनी स्पष्ट केले की, या व्यापार करारात कृषी आणि डेअरी क्षेत्राला पूर्ण संरक्षण देण्यात आले आहे. पंतप्रधान मोदींनी नेहमीच शेतकऱ्यांचे हित जपले असून, या डीलमध्येही तेच दिसते. हा करार भारताच्या अर्थव्यवस्थेला मजबूत करेल आणि नागरिकांसाठी नव्या संधी निर्माण करेल. हा करार दोन सर्वात मोठ्या लोकशाही देशांमधील व्यापार आणि विकासातील सहकार्याचा नवा अध्याय सुरू करतो. यामुळे मॅन्युफॅक्चरिंगला चालना, रोजगारनिर्मिती आणि 'विकसित भारत'च्या दिशेने वेग वाढेल, असेही गोयल म्हणाले.

लोकसभेने आज विरोधी पक्षातील आठ खासदारांना निलंबित केलं आहे. या खासदारांनी लोकसभेत कागदपत्रे भिरकावली असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, आज दिवसभरासाठी कामकाज तहकूब करण्यात आलं आहे. तसंच, निलंबित करण्यात आलेल्या आठ खासदारांमध्ये महाराष्ट्रातील एका खासदाराचाही समावेश आहे.

निलंबित केलेल्या ८ सदस्यांमध्ये गुरजीत औजला, हिबी एडन, माणिकम टागोर, प्रशांत यादराव पडोळे, किरण कुमार रेड्डी, डीन कुरियाकोसे, अमरिंदर सिंग राजा वारिंग आणि एस. वेंकटेशन यांचा समावेश आहे. लोकसभेतील पीठासीन अधिकारी दिलीप सैकिया यांच्यावर कागदपत्रे फेकून मारल्याने या घटनेचा विरोध केला. संसदीय शिष्टाचाराचा भंग असल्याचं म्हणत अर्थसंकल्पीय अधिवेशनात अशा कृती सहन केल्या जाणार नाहीत, असंही त्यांनी म्हटलंय. त्यामुळे आठ खासदारांना उर्वरित अर्थसंकल्पाकरता निलंबित करण्यात आलं आहे.

“संसदेत का बोलू दिलं जात नाही..”.यावर विरोधी पक्षनेने राहुल गांधी यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. पंतप्रधानांनी अमेरिकेसमोर ज्या प्रकारची शरणागती पत्करली आहे, व्यापार करार कसा झाला आणि व्यापार करारात घडलेल्या संशयास्पद गोष्टींमुळे हे घडले आहे. एपस्टाईन ही अशी गोष्ट आहे ज्यावर संसदेत चर्चा व्हायला हवी, परंतु या सर्व गोष्टींवर चर्चा झालेली नाही. आम्ही सभागृहाच्या आत आणि बाहेर आमचा निषेध सुरू ठेवू. आमचे आठ खासदार निलंबित आहेत, परंतु आम्ही संसदेच्या आत आणि बाहेर आमचा लढा सुरू आहे”, असं निलंबित करण्यात आल्यानंतर खासदार हिबी एडन म्हणाले.

### जनतेच्या हक्कासाठी फासावरही जाऊ....

“जनतेच्या हक्कासाठी जे लढतात त्यांना गायब केलं जातं किंवा निलंबित केलं जातं. जनतेच्या प्रश्नावर सरकार बोलत नाही. राहुल गांधींनी विचारलं आहे की इतर देश काही करत असेल तर आपण काय केलं पाहिजे. पण त्यांचा आवाज दडपवण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे त्यांच्या समर्थनार्थ उभे राहू. जनतेच्या हितासाठी मी फाशीवरही जायला तयार आहे”, असं खासदार प्रशांत पाडोळे म्हणाले.

### महीन्यांच्या चर्चेनंतर करार अंतिम : पियुष गोयल

केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पीयूष गोयल म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली अंतिम करण्यात आलेली ही डील आपल्या शेजारी देशांच्या तुलनेत भारतासाठी सर्वाधिक फायदेशीर आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून आमची टीम सातत्याने चर्चा करत होती. अनेक गुंतागुंतीचे विषय आणि अडचणी होत्या. भारतावर 50 टक्के टॅरिफ लावण्यात आले होते, ज्याचा सर्वांनाच फटका बसत होता. मात्र, मैत्रीच्या आधारावर आणि राष्ट्रीय हिताला प्राधान्य देत पंतप्रधानांनी ही उत्तम डील मिळवून दिली.



### राहुल गांधींनी केला निषेध

लोकसभेतील ८ खासदारांच्या निलंबनाविरोधात आणि भारत-अमेरिका व्यापार कराराच्या विरोधात लोकसभा खासदार राहुल गांधी, प्रियंका गांधी वड्रा आणि इतर खासदारांसह काँग्रेस खासदारांनी संसदेच्या मकर द्वार येथे निदर्शने केली. काँग्रेस खासदार प्रियंका गांधी वड्रा यांनी लोकसभेतून पक्षाच्या आठ खासदारांच्या निलंबनावर टीका केली. त्या म्हणाल्या, “हे हास्यास्पद आहे. लोकशाहीत प्रत्येक सदस्याला बोलण्याचा अधिकार असला पाहिजे आणि त्यांचे प्रश्न ऐकले पाहिजेत.”

# आधी बिनविरोध निवड अन् आता थेट महापौर!

## मंजूषा नागपुरे यांचा अर्ज महापौरपदासाठी भाजपकडून निश्चित

महाईन्यूज | पुणे

**महापालिकेच्या निवडणुकीत सिंहगड रस्त्यावरील प्रभाग क्रमांक ३४ मधून बिनविरोध निवडून आलेल्या मंजूषा नागपुरे यांचे नाव महापौरपदासाठी भाजपकडून निश्चित करण्यात आले आहे. नागपुरे यांनी मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल केला.**



> भाजपच्या सर्व नेत्यांनी विश्वास ठेवून महापौर पदाची मोठी संधी दिली आहे. महापौर पद हे केवळ उपभोगण्यासाठी नव्हे तर पुणेकरांची सेवा करण्यासाठी मिळालेली संधी आहे. त्यामुळे पुणेकरांना हेवा वाटेल त्याप्रमाणे काम करणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची खूप इच्छा होती. परंतु ते आपल्यामध्ये आज नाहीत, याची मोठी उणीव जाणवत आहे. महापौर पदावर काम करताना सर्वांचे मार्गदर्शन, साथ हवी आहे. तसेच जेन झींची मते विचारात घेवून काम करणार आहे.
>
> **– मंजुषा नागपुरे,** महापौर पदाच्या उमेदवार, भाजप.

महापालिकेत भाजपचे ११९ नगरसेवक विजयी झाले आहेत. भाजपची दुसऱ्यांदा महापालिकेत सत्ता आली असून यंदाचे महापौर पद खुला महिला यासाठी राखीव झाले असल्याने महापौर पदावर कोणाची वर्णी लागणार याबाबत मोठी उत्सुकता होती. भाजपकडून महापौर पदासाठी नागपुरे यांच्यासह वर्षा तापकीर, मानसी देशपांडे यांच्या नावाची चर्चा होती. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी नागपुरे यांच्या नावावर मंगळवारी सकाळी शिक्कामोर्तब केले. त्यानंतर नागपुरे यांनी महापौर पदासाठीचा अर्ज नगरसचिव योगिता भोसले यांच्याकडे दाखल केला.

महापौर पदासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार ) पक्षाकडून कोणीही उमेदवारी अर्ज दाखल करणार नसल्याची चर्चा होती. मात्र महापौर आणि उपमहापौर या दोन्ही पदांसाठी राष्ट्रवादीच्या उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. याबरोबरच कॉंग्रेस पक्षाने देखील महापौर पदाची निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला असून या दोन्ही पदांसाठी अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे येत्या ९ फेब्रुवारी ला सभागृहात मतदान होऊन नवीन महापौर पदाची निवड होणार हे निश्चित झाले आहे. महापौर, उपमहापौर पदाची निवडणूक ९ फेब्रुवारीला होणार आहे. या दिवशी मतदान प्रक्रिया सुरू करतानाच पीठासीन अधिकारी उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा कालावधी देतात. त्यानंतर अर्ज मागे न घेतल्यास निवडणूक प्रक्रिया राबवून सभागृहात मतदान होते. महापालिकेवर भाजपचे ११९ नगसेवक निवडून आले आहेत. भाजपकडे स्पष्ट बहुमत आहे. त्यामुळे नागपुरे यांचा विजय निश्चिच मानला जात आहे. त्यांच्या निवडीच्या घोषणा झाल्यानंतर सिंहगड रोड परिसराला प्रथमच महापौरपदाचा मान मिळणार असून, स्थानिक पातळीवर आनंद व्यक्त केला जात आहे. नागपुरे या सलग तिसऱ्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आल्या आहेत. यंदाच्या महापालिका निवडणुकीत त्यांनी प्रभाग क्रमांक ३४ मधून बिनविरोध विजय मिळविला आहे. महापालिकेतील त्यांचा कामाचा अनुभव, पक्षातील कार्य आणि संघटनात्मक कामकाजाची जाण लक्षात घेता त्यांच्या नावावर एकमत झाले. मंजूषा नागपुरे या कडव्या हिंदुत्ववादी विचारसरणी, भाजपच्या निष्ठावंत नगरसेविका म्हणून ओळखल्या जातात. महापालिकेच्या कामाच त्यांचा चांगला अनुभव आहे. स्थायी समितीसारख्या महत्त्वाच्या समितीवर त्यांनी काम केलेले आहे.

दरम्यान, उपमहापौर पदासाठी भाजपकडून परशुराम वाडेकर यांनी अर्ज भरला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) पक्षाकडून महापौर पदासाठी शीतल सांवत तर उपमहापौर पदासाठी दत्ता बहिरट यांचे नाव निश्चित केले आहे. या दोघांनी उमेदवारी अर्ज दाखल केले . तर कॉंग्रेसकडून महापौर पदासाठी अश्विनी लांडगे व उपमहापौर पदासाठी साहिल शिवाजी कादरी यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे.

# सुनेत्रा अजित पवार पुणे, बीड पालकमंत्रीपदी

महाईन्यूज | पुणे

**उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची बीड आणि पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री म्हणून नियुक्ती झाली आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर या दोन जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी कुणाकडे जाणार? याची राजकीय चर्चा सुरू झाली होती. बीड आणि पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाचा शासन निर्णय आज जारी करण्यात आला आहे. बीड आणि पुण्याचे पालकत्व आजपासून सुनेत्रा पवार यांच्याकडे राहणार आहे.**



### सुनेत्रा पवारांचे आव्हान वाढले

दरम्यान, अजित पवारांकडे पुणे आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी होती. २०२५ च्या विधानसभा निवडणुकीनंतर बीड जिल्ह्याची जबाबदारी पहिल्यांदाच अजित पवारांकडे आली होती. संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीड जिल्हा सर्वाधिक चर्चेत राहिला. त्यामुळे या जिल्ह्याकडे सर्वांचं लक्ष लागून होतं. मात्र, अजित पवारांकडे या जिल्ह्याची जबाबदारी आल्यानंतर तिथे सकारात्मक बदल व्हायला सुरुवात झाली होती. परंतु, बीडचा कायापालट सुरू असतानाच अजित पवारांचं अकाली निधन झालं. त्यामुळे त्यांच्या पश्चात ही जबाबदारी आता सुनेत्रा पवारांकडे देण्यात आली आहे. पुण्याचा विस्तार करण्याचे नियोजन आणि बीडमधील प्रलंबित प्रश्ने मार्गी लावण्याचं आव्हान आता सुनेत्रा पवारांसमोर असणार आहे.

राज्याच्या उपमुख्यमंत्री पदी विराजमान झाल्यानंतर सुनेत्रा पवारांना आणखी दोन जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. सुनेत्रा पवार आता बीड आणि पुणे या दोन जिल्ह्यांचे पालकमंत्री असणार आहेत. हे दोन्ही जिल्हे अजित पवारांकडे होते. आता त्यांच्या पश्चात सुनेत्रा पवारांकडे ही जबबादारी देण्यात आली आहे.

२८ जानेवारी रोजी अजित पवारांचं अपघाती निधन झालं. मुंबईहून बारामतीला येत असताना विमानाचा अपघात झाला. या अपघातात त्यांचा दुर्दैवी अंत झाला. त्यांच्यासह विमानात असलेल्या पाचही प्रवाशांचा मृत्यू झाला. यामध्ये त्यांचे सुरक्षा रक्षक, दोन पायलट आणि एका फ्लाइट अंटेडंटचा समावेश आहे.

### सुनेत्रा पवारांकडे तीन खाती

दरम्यान, अजित पवारांच्या अकाली निधनामुळे महाराष्ट्रावर शोककळा पसरली. तसंच, त्यांच्याकडे असलेली खातीही निराधार झाली. अजित पवार फक्त उपमुख्यमंत्री नव्हते, तर राज्यातील अनेक जबाबदाऱ्या सरकारने त्यांच्यावर सोपवल्या होत्या. त्यामुळे या जबाबदाऱ्या आता कोण सांभाळणार हा प्रश्न आहे. त्यामुळे त्यांचं उपमुख्यमंत्री पद त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवारांकडे देण्यात आलं. राज्याच्या ११ व्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा आणि युवक कल्याण आणि अल्पसंख्याक विकास ही तीन खाती देण्यात आली आहेत. तर अजित पवारांचे नियोजन आणि वित्त हे खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःकडे ठेवले आहे.

# अजितदादा गेले.. प्रशासन पुन्हा सुस्तावले!

## पुणे-पिंपरीतील वाहतूक कोंडीवर ब्रेक लावणारी पकड ढिली

**महाईन्यूज | पिंपरी चिंचवड**

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) हद्दीतील हिंजवडी आयटी पार्क, चाकण एमआयडीसी, पुणे-नाशिक आणि पुणे-नगर महामार्गावरील भीषण वाहतूक कोंडी फोडण्यासाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रशासनाला अक्षरशः वठणीवर आणले होते. मात्र, आता त्यांच्यासारखी धाकदपटशा आणि पकड उरलेली नसल्याने प्रशासकीय यंत्रणा पुन्हा ढिम्म झाल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. याचा थेट फटका सुरू असलेल्या आणि प्रस्तावित अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांना बसण्याची शक्यता आहे.**






वाहतूक कोंडी हा पुणे-पिंपरी परिसराचा दीर्घकालीन आजार. मात्र, हा आजार बरा करण्यासाठी अजित पवार आक्रमकपणे मैदानात उतरले होते. पालकमंत्री म्हणून २६ जुलै २०२५ रोजी हिंजवडी आयटी पार्क आणि ८ ऑगस्ट २०२५ रोजी चाकण एमआयडीसी परिसराची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली होती. पाहणीपुरतीच नव्हे, तर पीएमआरडीएच्या आकुर्डी येथील प्रशासकीय इमारतीत सलग आढावा बैठका घेऊन अधिकाऱ्यांची कानउघडणी केली होती.

### उपाय करा, नाहीतर कारवाई!

पीएमआरडीए, महापालिका, एमआयडीसी, रस्ते विकास महामंडळ, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण, पोलीस विभाग — एकही यंत्रणा त्यांच्या रोषातून सुटली नव्हती. “अतिक्रमण हटवा, रस्ते रुंद करा, भूसंपादन तात्काळ करा. सबबी चालणार नाहीत!” असे ठाम आदेश देत त्यांनी प्रशासनाला कामाला लावले होते. परिणामी हालचालींना वेग आला होता. मात्र, निवडणुकांची आचारसंहिता लागू होताच निविदा प्रक्रिया आणि इतर कामे रखडली. आचारसंहितेचे कारण पुढे करून प्रशासन पुन्हा सुस्तावल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे नव्या पालकमंत्र्यांनी अजित पवारांच्या धर्तीवर ठोस आणि आक्रमक पाठपुरावा करणे अपरिहार्य ठरले आहे.

### अडथळा आणाल तर थेट गुन्हे दाखल!

रस्ते रुंदीकरण किंवा भूसंपादनात कोणीही आडकाठी आणल्यास थेट गुन्हे दाखल करा, असे स्पष्ट निर्देश अजित पवार यांनी दिले होते. त्यामुळे दबाव, राजकारण आणि सबबींना थारा उरला नव्हता. प्रशासनाला उपाययोजना करणे भाग पडले होते. आता नव्या नेतृत्वाकडून अशीच ठाम भूमिका घेतली जाणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. “आमच्या लोकांची जमीन जातेय” असा आक्रोश करत स्थानिक आमदार आणि काही लोकप्रतिनिधींनी दबाव आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, अजित पवार यांनी हा दबाव सपशेल झुगारून लावत काम सुरू ठेवण्याचे आदेश दिले. संबंधित लोकप्रतिनिधींनाही त्यांनी स्पष्ट शब्दांत सुनावले होते. आज प्रश्न असा आहे की नवे पालकमंत्री हा राजकीय दबाव पेलू शकतील का?

### पहाटेच्या दौऱ्यांनी उडाली होती अधिकाऱ्यांची झोप

पहाटेच रस्त्यांवर उतरून पाहणी, अचानक बैठका आणि सततचा पाठपुरावा यामुळे जिल्ह्यातील अधिकाऱ्यांची झोप उडाली होती. काम न केल्यास फटकारा ठरलेलाच, ही भावना यंत्रणेत निर्माण झाली होती. अजित पवारांचे ‘वाहतूक कोंडीमुक्त पुणे’ हे स्वप्न पूर्ण करायचे असेल, तर नव्या पालकमंत्र्यांनी प्रशासनाला पुन्हा वठणीवर आणणे ही काळाची गरज आहे. अन्यथा, कोंडी वाढेल... आणि जबाबदारी कोण घेणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# महेशदादा लांडगे मोठ्या भावासारखे; महापौर रवी लांडगे

**महाईन्यूज | पिंपरी चिंचवड**

**गावकी-भावकीच्या राजकारणाची झालर असलेल्या पिंपरी-चिंचवड-भोसरीमध्ये पुन्हा एकदा गावकी-भावकी सरस ठरली आहे. महापौरपदाच्या निवडीसाठी बिनविरोध नगरसेवक रवि लांडगे यांची “बिनविरोध” नियुक्ती होणार यावर शिक्कामोर्तब झाले आहे. कारण, त्यांच्याविरोधात एकही अर्ज भरलेला नाही.**



विशेष म्हणजे, भोसरी विधानसभा मतदार संघात भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे आणि रवि लांडगे यांच्यामध्ये विधानसभा निवडणुकीच्या काळात “विस्तव जात नव्हता.” या निवडणुकीत प्रचंड स्पर्धा होती. त्यामुळे भाजपासह अन्य पक्षातील लांडगे विरोधकांचे चांगलेच फावले होते. पण, रवि लांडगे यांच्या एका सोशल मीडिया पोस्टने झारीतल्या शुक्राचाऱ्यांचा अक्षरश: भ्रमनिरास झाला आहे.

“भाजपा महापालिका सत्ताकाळात रवि लांडगे यांना महत्त्वाचे पद दिले नाही..” असा दावा करीत त्यांनी विधानसभा निवडणुकीच्यावेळी भाजपातून शिवसेना उबाठामध्ये प्रवेश केला होता. महाविकास आघाडीच्या जागावाटपात त्यांना संधी मिळाली नाही. महापालि 84 जागा मिळवत भाजपाने पुन्हा सत्ता मिळवली. त्यानंतर महत्त्वाच्या पदांवर महेश लांडगे कुणाला संधी देणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. रवि लांडगे महापौरपदासाठी तीव्र इच्छुक होते. त्यामुळे महेश लांडगे त्यांना छुपा विरोध करतील किंवा संधी देणार नाहीत, असा दावा केला जात होता. किंबहुना, रवि लांडगेच महापौर होतील... अशी सोशल मीडियावर अटकळ बांधून ‘नॅरेटिव्ह’ पसरवण्याचा प्रयत्न केला जात होता. मात्र, महेश लांडगे यांनी ‘अनप्रेडिक्टेबल डिसिझन’ घेतला. पक्षश्रेष्ठी आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन रवि लांडगे यांच्या नावावर एकमत करण्यात आले. त्यामुळे महेश लांडगेंसह गावकी-भावकीत “ दुहीची काडी टाकणारे” यांचा चांगलाच बंदोबस्त झाला आहे.

दरम्यान, महापौर रवि लांडगे यांनी केलेली सोशल मीडिया पोस्ट अत्यंत बोलकी आहे. किंबहुना, लांडगेंसह गावकी-भावकीत दरी निर्माण करुन राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचा चांगलीच चपराक आहे.

नवनिर्वाचित महापौर रवि लांडगे आपल्या पोस्टमध्ये म्हणातात की, स्वर्गीय अंकुशभाऊ लांडगे यांनी भारतीय जनता पक्षासाठी केलेल्या त्याग, समर्पण आणि निस्वार्थ सेवाभावाचा विशेष उल्लेख केला. त्यांच्या विचारधारेवर विश्वास ठेवून पक्षाने आपल्यावर जो विश्वास दाखवला आहे, तो महापौर पदावर कार्यरत असताना अखंड, प्रामाणिक व लोकाभिमुख सेवेच्या माध्यमातून सार्थ ठरवण्याचा संकल्प आहे.

या संपूर्ण प्रक्रियेत आमदार महेशदादा लांडगे यांनी “मोठ्या भावासारखे” खंबीर पाठबळ दिले. “प्रत्येक टप्प्यावर मिळालेले त्यांचे मार्गदर्शन, विश्वास आणि धैर्य माझ्यासाठी प्रेरणादायी ठरले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली काम करताना जबाबदारीची जाणीव अधिक ठळक होते आणि सेवा अधिक अर्थपूर्ण वाटते.”

स्वर्गीय अंकुशभाऊ लांडगे यांच्या कार्याचा व विचारांचा भारतीय जनता पक्षाने केलेल्या सन्मानाबद्दल त्यांनी पक्षाप्रती कृतज्ञताही व्यक्त केली आहे.

# व्यापार करार नव्हे, हा देशाच्या सार्वभौमत्वाचा सौदा!



## भूमिका

**अमेरिकेबरोबर झालेल्या व्यापार करारानंतर लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी उपस्थित केलेले प्रश्न केवळ राजकीय टीकेपुरते मर्यादित नाहीत, तर ते देशाच्या लोकशाही, अर्थव्यवस्था आणि सार्वभौमत्वाशी थेट संबंधित आहेत. संसदेमध्ये चर्चा टाळणे, विरोधी पक्षनेत्याला बोलू न देणे आणि घाईघाईत करारावर स्वाक्षरी करणे.**



पण केंद्र सरकारने त्यावर चर्चा टाळली, विरोधी पक्षनेत्याला बोलू दिले नाही, आणि कोणताही खुलासा न करता घाईघाईने करारावर स्वाक्षरी केली—ही सगळी लक्षणे स्पष्ट करतात की सरकार काहीतरी लपवत आहे.

**चार महिन्यांहून अधिक काळ रखडलेला करार अचानक मंजूर होतो-**

कोणताही बदल न करता. जर हा करार इतकाच फायदेशीर होता, तर संसदेत चर्चा का टाळली गेली? लोकशाहीत निर्णय सर्वांसमोर पारदर्शकतेने घेतले जातात. पण येथे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशासमोर स्पष्टता देण्याऐवजी संसदेवर मौनाची बेडी घातली, ही बाब खूप गंभीर आहे. ही पद्धत लोकशाहीच्या मुळभूत तत्त्वांवर केलेला हल्ला आहे.

**प्रतिमा वाचवण्यासाठी लोकशाहीचा बळी-**

पंतप्रधान मोदींची 'अजिंक्य' प्रतिमा तयार करण्यासाठी हजारो कोटी रुपये खर्च झाले. पण आता प्रतिमा तुटण्याची भीती असतानाच संसदेतील प्रश्न विचारणाऱ्यांचे आवाज दाबले जात आहेत. विरोधी पक्षनेत्याला राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बोलू न देणे हे फक्त राहुल गांधींचा अपमान नाही; हे संसदीय परंपरेवर थेट हल्ला आहे. ही कारवाई लोकशाहीच्या आत्म्याला धक्का देते. एकजूट, चर्चेची मोकळीक आणि उत्तरदायित्व यांचा विरोध करून सरकार लोकशाहीचा गुपितकार बनण्याचा प्रयत्न करत आहे.

**शेतकऱ्यांच्या घामाची किंमत किती?-**

या कराराचा सर्वात मोठा फटका भारतीय शेतकऱ्यांना बसणार आहे. परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या फायद्यासाठी भारतीय शेती खुली करणे म्हणजे शेतकऱ्यांच्या कवडीमोल मेहनतीला तुडवणे. शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणा, उत्पादन खर्च आणि हमीभावांच्या प्रश्नांचा विचार करता, हा करार शेतकऱ्यांवर अत्याचाराच्या स्वरूपात पडणार आहे. राहुल गांधींच्या म्हणण्यानुसार, हा करार केवळ शेतकऱ्यांचा नाही, तर संपूर्ण देशाचा सौदा आहे. परदेशी कंपन्यांसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी आणि उत्पादनावर करार करणं म्हणजे भारतीय स्वायत्ततेवर केलेला घात.

**दबाव कुणाचा? आणि का?**

या सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर अनेक प्रश्न आपोआप उभे राहतात. अमेरिकेत उद्योगपती गौतम अदाणी यांच्यावर सुरू असलेला खटला आणि त्याचे पंतप्रधान मोदींच्या आर्थिक मॉडेलशी असलेले कथित संबंध या विषयांवर सरकार जाणीवपूर्वक मौन बाळगत आहे. हा खटला केवळ एका उद्योगपतीपुरता मर्यादित नसून, सत्तेच्या आणि भांडवलाच्या साटेलोट्याला आव्हान देतो. त्यातच एपस्टीन फाईल्ससारखे गंभीर आंतरराष्ट्रीय मुद्दे समोर येत आहेत, तर सरकारची घाई आणि अस्वस्थता अधिकच संशयास्पद ठरते. ही घाई स्पष्टपणे सांगते की कराराच्या मागे फक्त देशाचा हित नाही, तर निवडक उद्योगपतींच्या दबावाखालील स्वार्थही काम करत आहेत.

**देशाला उत्तर हवे आहे-**

हा करार कोणाच्या फायद्यासाठी आहे? भारताच्या सर्वसामान्य नागरिकांच्या आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी, की काही निवडक उद्योगपतींच्या दबावाखाली? संसदेत चर्चा का टाळली गेली? विरोधी पक्षनेत्याला का गप्प बसवले गेले? लोकशाहीत प्रश्न विचारले म्हणजे देशद्रोह ठरवला जातो, तरी इतिहास सांगतो की सत्य दडवलं गेल्यावर तो अधिक जोरात बाहेर येतो.

सरकारने टीकेपासून पळ काढण्याऐवजी देशासमोर जबाबदारी स्वीकारली पाहिजे. खुलासा केला तरच लोकशाहीचा विश्वास टिकेल;

अन्यथा हा करार इतिहासात व्यापार करार म्हणून नव्हे, तर देशाच्या सार्वभौमत्वाचा घातक सौदा म्हणून नोंदला जाईल.

---

## प्रासंगिक »

### आईची माया

*एक तरुण गोविंदा बागेत मेहनतीने काम करत होता. सूर्य डोक्यावर येऊन ऊन रणरणत असतानाही त्याचे बागकाम संपत नव्हते.*

हे पाहून त्याची आई काळजीने घरातून त्याला वारंवार हाक मारत होती व उरलेले काम संध्याकाळी करायला सांगत होती. परंतु गोविंदा आपल्या कामात इतका गुंग झाला होता की तो आईच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत राहिला. शेवटी आईने आपल्या चार-पाच वर्षांच्या नातवाला, म्हणजेच गोविंदाच्या मुलाला, उचलून थेट बागेत नेऊन ठेवले. हे पाहून गोविंदा चिडला आणि आईला मुलाला उन्हात आणल्याबद्दल जाब विचारू लागला. मुलाला उन्हाचा त्रास होईल व त्यामुळे आपल्याला मानसिक वेदना होतील असे तो म्हणाला. तेव्हा आईने अत्यंत प्रेमळ पण ठाम शब्दांत सांगितले की, जशी आपल्या मुलाला ऊन लागल्याने तुझ्या जिवाची तगमग होते, तशीच तू उन्हात काम करत असल्याने माझ्याही मनाची तगमग होत असते. आईचा हा बिनतोड युक्तिवाद ऐकून गोविंदाला सत्य उमगले आणि तो लाजत, हसत घरात परतला.

**तात्पर्य-** आईचे प्रेम नि काळजी शब्दांपेक्षा खोल असते.

---

अजित पवारांना जाऊन अजून दहा दिवसही पूर्ण झालेले नसताना महाराष्ट्रातील राजकारणात सुरू झालेली आरोप-प्रत्यारोपांची मालिका सामान्य जनतेसाठी अस्वस्थ करणारी ठरत आहे.

## पक्षाचे विलिनीकरण की कुटुंबाचे विभाजन?

अजित पवारांच्या निधनाला अजून दहा दिवसही पूर्ण झालेले नाहीत आणि तोपर्यंत महाराष्ट्रातील राजकारणात सुरू झालेल्या आरोप-प्रत्यारोपांमुळे सामान्य जनतेमध्ये तीव्र अस्वस्थता निर्माण झाली आहे. एका प्रभावशाली आणि अनुभवी नेत्याच्या जाण्यानंतर अपेक्षित असलेली शांतता, शोकभावना आणि आत्मपरीक्षण बाजूला पडून राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चेने राजकीय वातावरण अधिकच तापले आहे.

अजित पवारांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी पक्षाच्या विधीमंडळ गटनेतेपदी निवड करण्यात आली आणि त्यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मात्र या घडामोडी होण्यापूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेसमधील दोन गट पुन्हा एकत्र येण्याच्या चर्चेला वेग आला होता. महापालिका निवडणुकांच्या काळातच विलीनीकरणाबाबत कुजबुज सुरू झाली होती आणि १२ फेब्रुवारी रोजी शरद पवार व अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत विलीनीकरण निश्चित झाल्याचा दावा काही नेत्यांकडून केला जात आहे.

या विलीनीकरणाच्या चर्चेमुळे राष्ट्रवादीत दोन स्पष्ट भूमिका समोर आल्या आहेत. एक गट या निर्णयाच्या समर्थनात आहे, तर दुसरा गट तीव्र विरोध करत आहे. या वादात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रतिक्रिया देत, असा निर्णय घेण्याआधी दादांनी मला स्वतः सांगितले असते, असे विधान केले. यामुळे हा विषय अधिक राजकीय वादग्रस्त ठरला. सुनेत्रा पवारांच्या शपथविधीनंतर सुनिल तटकरे, प्रफुल पटेल, छगन भुजबळ आणि धनंजय मुंडे यांच्यावर विरोधकांकडून जोरदार टीका सुरू





झाली आहे.अजित पवार हे शरद पवारांचे पुतणे आणि त्यांच्या राजकीय वारसदार म्हणून ओळखले जात होते. त्यामुळे शरद पवारांच्या मूळ राष्ट्रवादी पक्षावर अजित पवारांनी दावा केला, तेव्हा अनेकांना तो स्वाभाविक वाटला. भाजपसोबत सत्तेत जाण्याचा निर्णयही त्या पार्श्वभूमीवर स्वीकारला गेला. मात्र दादांच्या निधनानंतर शरद पवार गटाची भावना अशी आहे की, दादांनंतर हा पक्ष इतर नेत्यांनी वैयक्तिक स्वार्थासाठी वापरू नये. या सर्व घडामोडींना आणखी गंभीर वळण देत अपघात की घातपात, या चर्चेलाही उधाण आले आहे. आमदार अमोल मिटकरी आणि खासदार संजय राऊत यांनी काही प्रश्न उपस्थित केल्यामुळे संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. देशाचा अर्थसंकल्प सादर होऊनही महाराष्ट्राच्या वाट्याला काय मिळाले, यापेक्षा राष्ट्रवादीतील अंतर्गत संघर्षाचीच चर्चा अधिक रंगताना दिसते.

अजित पवारांचे जाणे राज्यासाठी मोठी हानी आहे. मात्र त्यांच्या निधनानंतरही राष्ट्रवादीतील संघर्ष अधिक तीव्र होत असेल, तर हे केवळ दुर्दैवीच नव्हे, तर महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीसाठीही गंभीर चिंतेचा विषय ठरत आहे.

---

## ।। अभंगवाणी ।।



लोक म्हणती वेडा, उपहास करी ।
पंढरीचा वाटे, मजला भारी ॥१॥

सोडिला संसार, तुटली माया ।
विठ्ठ्या चरणी, विसावली काया ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**बिझनेस हेड : विकास कदम | मुख्य कार्यकारी संपादक : अविनाश आदक.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# विलानीकरण होणार? सुनील तटकरेंच वक्तव्य

## विलीनीकरण कोणाचे अन् कोणत्या पक्षात होणार? स्पष्टच सांगितले

महाईन्यूज । मुंबई

**अजित पवार यांच्यामुळे रिक्त झालेल्या उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सुनेत्रा पवार यांनी घेतली. अजित पवारांकडे असलेली काही खातीही त्यांना देण्यात आली. पण, अर्थखाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ठेवले गेले आहे. त्यामुळे अर्थ खाते राष्ट्रवादी काँग्रेसला मिळणार की याबद्दल स्पष्टता आलेली नाही. त्याबद्दलच पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांना विचारण्यात आले. त्यांनी बैठकीत झालेल्या निर्णयाची माहिती दिली.**



राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांची दिल्लीमध्ये पत्रकार परिषद पार पडली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या भेटी आधी झालेल्या या पत्रकार परिषदेत त्यांनी अर्थखात्याबद्दल भूमिका मांडली.

**मुख्यमंत्री फडणवीसांसोबत काय चर्चा झाली?**

अर्थ खाते अजित पवार सांभाळत होते. ते तुमच्याकडेच राहणार आहे का? असा प्रश्न प्रफुल पटेल यांना विचारण्यात आला होता. प्रफुल पटेल म्हणाले, "आमची मुख्यमंत्र्यांसोबत जी चर्चा झाली. त्यामध्ये त्यांनी सांगितले की, सुनेत्रा पवार महाराष्ट्र सरकारचा घटक म्हणून नवीन आहेत. बाकीच्या प्रक्रिया समजण्यामध्ये त्यांना थोडा वेळ लागेल."

**अजित पवारांना अडचण नव्हती, कारण...**

पटेल पुढे म्हणाले की, "मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, काही दिवसांमध्ये बजेट मांडणार आहे. त्यांना अडचण होऊ नये. कसे असते की, अर्थसंकल्प फक्त बोलण्याचेच काम नसते. त्यावर चर्चा होते. त्याला उत्तर द्यावे लागते. अर्थसंकल्प तयार करण्याची प्रक्रियाही मोठी असते. अजित पवारांना दीर्घ अनुभव होता. त्यामुळे त्यांना काही अडचण नव्हती."

"सुनेत्रा वहिनींना थोडा वेळ लागेल. म्हणून ते (मुख्यमंत्री फडणवीस) म्हणाले की, अर्थसंकल्पीय अधिवेशन होऊ द्या. मी सांभाळतो. तात्पुरते अर्थ खाते मी सांभाळतो. नंतर सुनेत्रा वहिनींशी बोलून, तुमच्यासोबत बोलून शेवटी अंतिम निर्णय तुम्हाला योग्य वाटत असेल, तसा करु", अशी माहिती प्रफुल पटेल यांनी अर्थ खात्याबद्दलच्या प्रश्नावर दिली.

### पुणे, बीडच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी

सुनेत्रा पवार यांच्याकडे तीन खात्यांची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यानंतर पुण्यासारख्या महत्त्वाच्या जिल्ह्याचे पालकमंत्री पद आणि गेल्या काही वर्षात गुन्हेगारीमुळे चर्चेत राहिलेल्या बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद कुणाकडे जाणार, याकडेही लक्ष होते. या दोन्ही जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी अजित पवार यांच्याकडे होती. ती जबाबदारी आता सुनेत्रा पवार यांच्याकडे देण्यात आली आहे.

# कुडाळात राजकीय भूकंप: सोमनाथदादा कदम भाजपमध्ये!

महाईन्यूज | सातारा

**जावळी तालुक्यातील राजकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या कुडाळ जिल्हा परिषद गटात मोठी राजकीय उलथापालथ झाली आहे. कुडाळचे उपसरपंच सोमनाथदादा कदम आणि महेश कदम यांनी आपल्या शेकडो तरुण कार्यकर्त्यांसह आणि ज्येष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्याचे बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रराजे भोसले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.**



“ राजकारण हे समाजकारणाचे साधन आहे आणि जेव्हा विकासाचा प्रश्न येतो, तेव्हा हेवेदावे बाजूला ठेवून एकत्र येणे गरजेचे असते. सोमनाथदादा कदम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विकासाची ध्येयधोरणे स्वीकारून आज भाजपमध्ये प्रवेश केला आहे, त्यांचे मी मनापासून स्वागत करतो. कुडाळ भागातील प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी आणि या परिसराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सत्तेच्या माध्यमातून विकासकामांचा निधी थेट जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी आता आमची ही भक्कम फळी अधिक वेगाने काम करेल.

– **शिवेंद्रराजे भोसले, सार्वजनिक बांधकाम मंत्री.**

### विकासासाठी उचललेले पाऊल: सोमनाथ कदम

पक्षप्रवेशानंतर आपली भूमिका मांडताना सोमनाथदादा कदम म्हणाले की, “आम्ही केवळ आणि केवळ विकासाच्या दृष्टिकोनातून हे पाऊल उचलले आहे. आमच्या भागाचा प्रलंबित विकास आणि जनतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सत्ताधारी गटासोबत राहणे काळाची गरज आहे. हा प्रवेश आमच्या भागाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मोलाचा ठरेल.” तसेच, या प्रवेशामुळे कुडाळ गटातील संपूर्ण राजकीय गणिते आता बदलणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### कार्यकर्त्यांचा अभूतपूर्व उत्साह..

या सोहळ्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे यावेळी केवळ तरुणांचाच मोठा सहभाग नव्हता, तर ज्येष्ठ नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून या निर्णयाला पाठिंबा दिला. यामध्ये नामदेव कदम, मोहन कदम, कृष्णात पवार, शंकर पवार, राजेंद्र शिंदे, रामदास कदम, उत्तम कदम, हनुमान शिंदे, आत्माराम चौधरी, मुरलीधर कदम, नथुराम पाटील, नवले बंधू, विक्रम शेळके, संदीप आबा पवार, विकी पवार, किरण कदम, विक्रम कदम, आकाश शेवते, गणेश कदम, हनुमंत कदम, सुनील दादा पवार, संभाजी मोरे, दिलीप पवार, रवींद्र पवार, संतोष पवार, किरण पवार, यांच्यासह शेकडो मान्यवर उपस्थित होते.

### विरोधी भूमिका सोडा, विकासासाठी एकत्र या – शिवेंद्रराजे भोसले

यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ना. शिवेंद्रराजे भोसले यांनी नूतन सदस्यांचे स्वागत केले. ते म्हणाले, “राजकारण करत असताना नेहमीच विरोधी भूमिका न ठेवता, सत्तेत एकत्र राहून काम केल्यास विकासाचा वेग वाढतो. आपल्या भागाचा विकास करायचा असेल तर सर्वांनी विकासभिमुख दृष्टिकोन ठेवून काम केले पाहिजे.” शिवेंद्रराजेंनी यावेळी उपस्थित समस्त कार्यकर्त्यांना जनसेवेसाठी कटिबद्ध राहण्याचे आवाहन केले.

# कॉन्फिडंट ग्रुपच्या 'किंग' चा करुण अंत!

## डॉ. सी. जे रॉय यांची आत्महत्या, समोर आलं कारचं कलेक्शन

महाईन्यूज । बंगळुरु

**रिअल इस्टेट क्षेत्रात काम करणआरे आणि कॉन्फिडंट ग्रुपचे चेअरमन डॉ. सी. जे. रॉय यांनी बंगळुरु या ठिकाणी स्वतःवर गोळी झाडून घेत आत्महत्या केली. ३० जानेवारीला ही बातमी समोर आली. सातत्याने होणाऱ्या प्राप्तीकर खात्याच्या कारवाईमुळे रॉय तणावग्रस्त झाले होते. त्याच तणावातून रॉय यांनी आत्महत्येसारखं टोकाचं पाऊल उचललं. रॉय त्यांच्या घरी होते, त्यावेळी त्यांच्या कार्यालयावर आयटीची धाड पडली. ज्यानंतर त्यांनी स्वतःवर गोळी झाडून घेत आयुष्य संपवलं. आता रॉय यांची मालमत्ता आणि त्यांच्याकडे असलेल्या लक्झरी कार यांची माहिती समोर आली आहे.**





### डॉ. रॉय यांचं कार प्रेम सर्वश्रुत होतं

रॉय यांनी मागच्या अनेक वर्षांत अनेक उंची आणि आलिशान कार विकत घेतल्या. रोल्स रॉईस, लँबॉर्गिनी, बुगाटी व्हेरॉन अशा सगळ्या गाड्या त्यांच्या गॅरेजमध्ये उभ्या आहेत. नोव्हेंबर २०२५ मध्ये रॉय यांनी १२ कोटी रुपयांची रोल्ल रॉईस फँटम ही कार विकत घेतली होती. ही त्यांची बारावी कार ठरली. त्यांच्या सोशल मीडिया पोस्टवर त्यांनी ही माहिती दिली होती. तसंच त्यांनी पहिली रोल्स रॉईस कार २००८ मध्ये घेतल्याचंही म्हटलं होतं. जुलै २०२५ मध्ये त्यांनी निळ्या रंगाची फेरारी कारही विकत घेतली होती. पैशांनी तुम्ही काहीही विकत घेऊ शकता पण तुम्हाला साधेपणा विकत घेता नाही, फेरारी कार हवाई चप्पल घालून तुम्ही चालवू शकता अशी कॅप्शन त्यांनी लिहिली होती. जी लक्षवेधी ठरली होती.

### १२ रोल्स रॉईस कार, फेरारी आणि बऱ्याच कार त्यांच्या कलेक्शनमध्ये

सी. जे. रॉय हे त्यांच्या कार प्रेमामुळे कायमच चर्चेत असत. वयाच्या २५ व्या वर्षी त्यांनी पहिलं वाहन घेतल्याची पोस्ट त्यांनी केली होती. तर गेल्या वर्षी जुलै महिन्यात त्यांनी नवी कार घेतल्याचे फोटो पोस्ट केले होते. त्यांच्याकडे १२ रोल्स रॉईस कार आहेत. तर २००५ मध्ये त्यांनी लिमोझीन ही कार विकत घेतली होती.

### इन्स्टाग्रामवर रॉय यांचे अनेक फॉलोअर्स

एका इन्स्टाग्राम पोस्टमध्ये त्यांनी दुबई या ठिकाणी त्यांच्या कारचं जे कलेक्शन होतं त्याचा व्हिडीओ पोस्ट केला होता. या व्हिडीओत बुगाटी, लँबॉर्गिनी, बेंटले, रोल्स रॉईस अशा अनेक उंची कार दिसल्या. सोशल मीडियावर त्यांचे अनेक फॉलोअर्स होते. दरम्यान त्यांच्या आत्महत्येचा तपास बंगळुरु पोलीस करत आहेत. तपासात ही आत्महत्या आहे हे समोर आलं आहे आम्ही पुढील तपास करत आहोत अशी माहिती बंगळुरु पोलीस विभागाचे प्रमुख सीमांत कुमार यांनी म्हटलं आहे. एनडीटीव्हीने हे वृत्त दिलं आहे.

# ऑस्ट्रेलियातील ४२६ किलो गांधी पुतळा चोरीला

महाईन्यूज । बंगळुरु

**मेलबर्नमधील रोव्हिल येथे महात्मा गांधींच्या पुतळ्याची मंगळवारी विटंबना करण्यात आली. येथील पुतळाच चोरीला गेल्याचं समोर आलं आहे. हे प्रकरण भारतात समजताच परराष्ट्र मंत्रालयाने जबाबदार असलेल्यांवर त्वरित कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. हिंदूस्तान टाइम्सने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.**

"मेलबर्नमधील रोव्हिल येथील ऑस्ट्रेलियन इंडियन कम्युनिटी सेंटरमध्ये असलेल्या महात्मा गांधींच्या पुतळ्याची अज्ञात लोकांनी केलेल्या तोडफोडीचा आम्ही तीव्र निषेध करतो", असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी माध्यमांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. जयस्वाल म्हणाले की, भारताने "ऑस्ट्रेलियन अधिकाऱ्यांकडे हा मुद्दा जोरदारपणे उपस्थित केला आहे", त्यांनी पुतळा परत मिळवण्यासाठी त्वरित कारवाई करावी आणि दोषींना जबाबदार धरावे अशी विनंती केली आहे.



ऑस्ट्रेलिया टुडेला दिलेल्या निवेदनात पोलिसांनी म्हटले आहे की, रोव्हिलमधील किंग्सले क्लोज येथील चॅरिटी परिसरातून तीन अज्ञात व्यक्तींनी ही मूर्ती रात्री १२.५० वाजता चोरली. या प्रकरणाची चौकशी सुरू असल्याने, पोलिसांनी भंगार धातू विक्रेत्यांना कांस्य पुतळा विकण्याचा प्रयत्न करणाऱ्यांपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे आणि कोणत्याही संशयास्पद हालचालीची त्वरित तक्रार करण्याचे आवाहन केले आहे.

### ४२६ किलो वजनाचा महात्मा गांधींचा पुतळा चोरीला गेला

मेलबर्नमधील रोव्हिल येथील ऑस्ट्रेलियन इंडियन कम्युनिटी सेंटरच्या बाहेर बसवण्यात आलेला महात्मा गांधींचा कांस्य पुतळा १२ जानेवारी रोजी पहाटे चोरीला गेला, असे ऑस्ट्रेलिया टुडेने वृत्त दिले आहे. ४२६ किलो वजनाचा हा पुतळा नवी दिल्ली येथील इंडियन कल्चरल रिलेशन्स कौन्सिल (ICCR) कडून भेट म्हणून देण्यात आला होता, ज्याचे उद्घाटन २०२१ मध्ये ऑस्ट्रेलियाचे माजी पंतप्रधान स्कॉट मॉरिसन यांनी केले होते. ऑस्ट्रेलिया टुडेच्या वृत्तानुसार, व्हिक्टोरिया पोलिसांच्या नॉक्स क्राइम इन्व्हेस्टिगेशन युनिटने चोरीचा तपास सुरू केला आहे, ज्यामुळे मेलबर्नच्या भारतीय-ऑस्ट्रेलियन समुदायात पुन्हा चिंता निर्माण झाली आहे.


## महेश बाबूची लेक सिताराचा जलवा



साउथ सुपरस्टार महेश बाबू आणि नम्रता शिरोडकर यांची मुलगी सितारा घट्टामनेनी पुन्हा एकदा तिच्या सुंदर लुकमुळे चर्चेत आली आहे. सिताराला आता फॅशन आयकॉन म्हणून ओळखले जात आहे. सध्या तिचा ज्वेलरी एक्झिबिशनमधील एक व्हिडीओ व्हायरल होत असून, ज्यात ती रॅम्प वॉक करताना दिसत आहे. एका लक्झरी ज्वेलरी प्रदर्शनाच्या लॉन्च इव्हेंटमध्ये १३ वर्षांच्या सिताराने आपल्या उपस्थितीने आणि खास फॅशनमुळे सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. याशिवाय आई नम्रतासोबत सिताराचे व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. आई-मुलीची जोडी पाहून प्रेक्षक थक्क झाले आहेत. त्यांच्या या व्हिडीओवर चाहते, कलाकार भरभरून कमेंट्स करत आहे. तिच्या सौंदर्याचे, स्टाइलचे आणि फॅशनचे कौतुक करत आहेत. सोशल मीडिया युजर्स तिला “फ्युचर सुपरस्टार” आणि “यंग फॅशनिस्टा” म्हणत आहे, उपाध्या देत आहेत. ही पहिलीच वेळ नाही की सिताराने चर्चेत स्थान मिळवले आहे. याआधीही तिने मोठ्या ब्रँड्ससोबत काम केले आहे, त्यावेळी देखील तिच्या फॅशन सेन्सचे कौतुक झाले होते.

## मे महिन्यात उगवणार ‘चांद’





अलीकडच्या काळात अनन्या पांडेने एका मागोमाग एक सुपरफ्लॉपच आहेत. मागील वर्षी ख्रिसमसच्या मुहूर्तावर प्रदर्शित झालेल्या कार्तिक आर्यनसोबतच्या 'तू मेरी मै तेरा मै तेरा तू मेरी' या चित्रपटाने घोर निराशा केली. त्यामुळे अनन्या आता एका हिट चित्रपटाच्या प्रतीक्षेत आहे. धर्मा प्रॉडक्शनसच्या बहुप्रतीक्षित रोमँटिक ड्रामा 'चांद मेरा दिल'मध्ये ती लक्ष्यसोबत दिसणार आहे. हा चित्रपट अगोदर १० एप्रिल रोजी प्रदर्शित होणार असल्याची चर्चा होती, पण या चित्रपटासाठी रसिकांना आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे. निर्मात्यांनी दिलेल्या नव्या अपडेटनुसार 'चांद मेरा दिल' ८ मे रोजी प्रदर्शित होणार आहे. 'मीनाक्षी सुंदरेश्वर' फेम विवेक सोनी या चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत. या निमित्ताने अनन्या आणि लक्ष्य ही जोडी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## तमन्ना भाटियाचा मुंबईत ज्वेलरी स्टोअरचा भव्य शुभारंभ



लोकप्रिय अभिनेत्री तमन्ना भाटिया हिने अभिनयासोबतच आता लक्झरी ज्वेलरी व्यवसायातही पाऊल टाकलं आहे. शनिवारी तिने मुंबईतील जुहू परिसरात ‘तमन्ना स्टोअर’ या आपल्या फाइन ज्वेलरी बुटीकचं अधिकृत उद्घाटन केलं. या भव्य सोहळ्याला बॉलिवूड आणि दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील अनेक नामवंत कलाकारांनी हजेरी लावली. सध्या अनेक कलाकार चित्रपटांपलीकडे जाऊन लाइफस्टाइल आणि लक्झरी ब्रँड्समध्ये गुंतवणूक करत आहेत. तमन्नाचा हा नवा प्रवास स्वतःचा ब्रँड उभारण्याच्या वाढत्या ट्रेंडचं उत्तम उदाहरण मानल जात आहे. जुहूतील स्टार्सनी सजलेला लॉन्च सोहळा जुहूतील पॉश भागात झालेल्या या कार्यक्रमात अनेक सेलिब्रिटी दिसून आले. आर्यन खान या लॉन्चला उपस्थित होता आणि त्याने तमन्नाच्या नव्या उपक्रमाला पाठिंबा दिला. तो अभिनेत्री अन्या सिंहसोबत फोटो काढताना दिसला, ज्यामुळे कार्यक्रमाची चर्चा आणखी वाढली. या कार्यक्रमात सहभागी झालेल्या इतर कलाकारांमध्ये समंथा रुथ प्रभू, सिद्धार्थ मल्होत्रा, रिया चक्रवर्ती, पूजा हेगडे, काजल अग्रवाल, अविनाश तिवारी, फराह खान, हेदेखील या सोहळ्याला उपस्थित होते.

## अभिनेत्री तब्बू 54 वर्षांची झाली



अभिनेत्री तब्बू बॉलिवूड इंडस्ट्रीतील यशस्वी अभिनेत्रींपैकी एक आहे. तिने ९० च्या दशकात अनेक चित्रपटातून आपल्या अभिनयाने प्रेक्षकांमध्ये लोकप्रियता मिळवली. आजही ती चित्रपटसृष्टीत सक्रीय असून, सतत आव्हानात्मक भूमिका साकारताना दिसते. तब्बू ५४ वर्षांची झाली असून तरीही तिचा अभिनय तितकाच सहज आणि सुंदर असतो. तिची प्रत्येक चित्रपटातील भूमिका लक्षवेधक असते. तब्बूने लग्न का केले नाही याबाबत तिने अनेक मुलाखतींमध्ये स्पष्टपणे कारण सांगितले आहे. आता नुकत्याच एका मुलाखतीत तब्बूने तिच्या बालपणीच्या आठवणींना उजाळा देताना एक कडू आठवण सांगितली आहे. तब्बू ३ वर्षांची असताना तिच्या आई वडीलांनी घटस्फोट घेत विभक्त होण्याचा निर्णय घेतला. अभिनेत्री याविषयी बोलताना म्हणाली, तिच्या जन्मदात्या वडीलांनी ती कधीही भेटली नाही आणि त्यांच्याशी असलेल्या तिच्या नात्याचा कधीही तिने उल्लेख केला नाही, जो तिच्या मते घटस्फोटानंतर संपला.

# सर्वोच्च न्यायालयाने रोहित पवारांना फटकारले

## महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीवरील स्थगिती कायम

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

**सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या (एमसीए) निवडणुकीवर मुंबई उच्च न्यायालयाने लावलेली स्थगिती उठवण्यास नकार दिला. स्थगिती कायम ठेवताना न्यायालयाने एमसीएचे अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) आमदार रोहित पवार यांना कठोर शब्दात फटकाले आहे. त्यामुळे पवार यांच्या समोरील अडचणी वाढल्या आहेत.**





सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची व विपुल एम. पंचोली यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. एमसीएचा निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याच्या दोन महिने अगोदर झालेल्या सर्वसाधारण सभेत सुमारे ४०० जणांना नव्याने सदस्यत्व देण्यात आले होते. त्यात रोहित पवार यांच्या निकटवर्तीयांचा समावेश असल्याचा आरोप करून माजी क्रिकेटपटू केदार जाधव, लातूर जिल्हा क्रिकेट संघटना, अनंत नीळकंठ माटे (एमसीएचे आजीवन सदस्य) आणि शिक्षण प्रसारक मंडळींच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे यांनी दाखल केलेल्या याचिकांवर उच्च न्यायालयाने निवडणूक प्रक्रिया स्थगिती करण्याचे आदेश दिले होते.

आमच्याकडून आणखी टीका करून घेऊ नका; मुंबई उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती योग्य आहे. उच्च न्यायालयाने तुम्हाला मोठा घोटाळा करण्यापासून रोखले आहे. आमच्याकडून आणखी टीका करून घेऊ नका, असे म्हणत खंडपीठाने पवार यांना फटकारले आहे. या प्रकरणावर उच्च न्यायालयात गुणवत्तेच्या आधारावर सुनावणी प्रलंबित आहे आणि एमसीए तिथे आपली बाजू मांडू शकते. प्रकरण उच्च न्यायालयात प्रलंबित असताना, तुम्ही तिथे जाऊन युक्तिवाद कसा करू शकता, असे म्हणत खंडपीठाने उच्च न्यायालयाने निवडणुकीला दिलेली स्थगिती कायम ठेवली आहे. तसेच अपील स्वीकारण्यास नकार देत, एमसीएला उच्च न्यायालयातच या प्रकरणावर युक्तिवाद करण्यास सांगितले. खंडपीठाचा हा अंतरिम आदेश विद्यमान एमसीए अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) आमदार रोहित पवार यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

### नव्या सदस्यांमध्ये कुटुंबीय, नातेवाईकांचा भरणा

सुमारे ४०० नवीन सदस्यांमुळे एमसीएच्या संपूर्ण स्वरूपातच बदल होईल, असेही खंडपीठाने म्हटले आहे. केदार जाधव यांनी याचिकेत आरोप केला आहे की, आमदार रोहित पवार यांचे नातेवाईक आणि कुटुंबियांचा ४०० जणांमध्ये समावेश आहे. पत्नी कुंती पवार आणि सासरे सतीश मगर, खासदार सुप्रिया सुळे यांची मुलगी रेवती, बारामती ॲग्रोचे सुभाष गुळवे यांच्यासह ३० हून अधिक राष्ट्रवादी काँग्रेस नेत्यांचा समावेश आहे. असा दावाही याचिकेत करण्यात आला होता. तसेच ही नावे कायद्याच्या योग्य प्रक्रियेचे पालन न करता अचानक समाविष्ट करण्यात आली, असा आरोपही जाधव यांनी केला होता.

# वर्ल्डकपपूर्वीच PCB चं टेन्शन वाढलं; पाकिस्तानवर कारवाई

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

**आयसीसी टी -२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेला येत्या ७ फेब्रुवारीपासून सुरुवात होणार आहे. भारतीय संघ आपला पहिला सामना अमेरिकेविरुद्ध खेळणार आहे. तर सर्वात महत्वाचा सामना म्हणजे १५ फेब्रुवारीला भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ आमनेसामने येणार आहेत. पण पाकिस्तानने स्पर्धेला सुरुवात होण्याआधीच भारताविरुद्ध खेळण्यास नकार दिला आहे. भारताविरुद्ध खेळण्यास नकार दिल्याने ब्रॉडकास्टर्सचं मोठं नुकसान होणार आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या या निर्णयामुळे अधिकृत ब्रॉडकास्टर जियोस्टार कडून पाकिस्तानवर क्रिकेट बोर्डावर कायदेशीर कारवाई होण्याची टांगती तलवार आहे.**




आयसीसी टी -२० वर्ल्डकप स्पर्धेचे आयोजन भारत आणि श्रीलंकेत केले जाणार आहेत. पाकिस्तानचे सामने श्रीलंकेत खेळवले जाणार आहेत. पाकिस्तानने इतर संघाविरुद्ध खेळण्यास होकार दिला आहे. तर भारताविरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. या सामन्यावर बहिष्कार का टाकला, याबाबत पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आयसीसीला अद्यापही कारण सांगितलेलं नाही. भारत – पाकिस्तान सामन्यावर बहिष्कार टाकल्याने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचं मोठं नुकसान होणार आहे. तर जियो हॉटस्टारकडून कायदेशीर कारवाई देखील केली जाऊ शकते.

सामना न झाल्यास ब्रॉडकास्टर्सचं मोठं नुकसान होणार आहे. या नुकसानाची भरपाई पाकिस्तानकडून वसूल केली जाऊ शकते. याशिवाय, पाकिस्तानला मिळणारा वार्षिक महसूल हिस्सा, जो अंदाजे ३५ दशलक्ष डॉलर्स (सुमारे २९० कोटी रुपये) आहे, तो आयसीसी रोखून धरू शकते. या पैशांचा वापर हा ब्रॉडकास्टर्सचं होणारं नुकसान भरून काढण्यासाठी केला जाऊ शकतो. अशी शक्यता पीसीबीच्या सूत्रांनी वर्तवली आहे.

भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांमध्ये सीमांतर्गत वाद आहेत. त्यामुळे दोन्ही देशांमध्ये द्विपक्षीय मालिका खेळवली जात नाही. दोन्ही संघ केवळ आयसीसीच्या स्पर्धांमध्ये आमनेसामने येत असतात. पण द्विपक्षीय मालिका वगळता इतर स्पर्धांसाठीही भारताने पाकिस्तानात जाण्यास, तर पाकिस्तानने भारतात येण्यास नकार दिला आहे. त्यामुळे दोन्ही संघांचे सामने हे न्यूट्रल वेन्यूवर खेळवले जातात. आता पाकिस्तान क्रिकेट बोर्ड होणाऱ्या नुकसानाची भरपाई करण्यास होकार देणार, की हा तोटा टाळण्यासाठी भारताविरुद्ध खेळण्यास होकार देणार? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज ™
ePaper
। बुधवार ।
दि. 04 फेब्रुवारी 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### उत्सुकता शिगेला : सत्ताधारी भाजपाने "पॉलिटिकल बॅलन्स" धोरण

# PCMC : सस्पेन्स कायम..! स्थायी समितीच्या अध्यक्षपदावर कोणाची वर्णी लागणार ?


**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**महापालिकेतील सत्तावाटप जवळपास स्पष्ट झाले असले, तरी स्थायी समितीच्या अध्यक्षपदावर कोणाची वर्णी लागणार, याबाबत सस्पेन्स कायम आहे. सत्तारूढ पक्षनेत्याची जबाबदारी प्रशांत शितोळे यांच्याकडे सोपविली असून, ते चिंचवड विधानसभा मतदारसंघातून येतात.**



## मला कोणतेही पद नको : नगरसेवक शीतल शिंदे

- महापौर आणि उपमहापौर उमेदवारीच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये अंतर्गत नाराजी उघडपणे समोर येत आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी अधिकृत पत्राद्वारे उपमहापौरपदासाठी नाव जाहीर करूनही विजय उर्फ शीतल गोरख शिंदे यांनी हे पद स्वीकारण्यास स्पष्ट शब्दांत नकार दिला.
- 'मला कोणतेही पद नको. मी पक्षाचा एक सामान्य कार्यकर्ता म्हणूनच काम करेन,' अशी भूमिका घेत ते महापालिकेतून बाहेर पडले. यामुळे भाजपच्या शहर संघटनेत अस्वस्थता असल्याचे स्पष्ट झाले आहे.



महापौर पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेले रवी लांडगे हे भोसरी विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात. तर उपमहापौर पदासाठी अर्ज दाखल केलेल्या शर्मिला बाबर या पिंपरी विधानसभा मतदारसंघातून येतात. त्यामुळे भोसरी, पिंपरी आणि चिंचवड या तीनही विधानसभा मतदारसंघांना प्रत्येकी एक महत्त्वाचे पद दिल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आता महापालिकेतील सर्वाधिक महत्त्वाची समजली जाणारी स्थायी समितीचे अध्यक्षपद कोणाच्या वाट्याला जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आर्थिक निर्णयांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या या पदासाठी कोणाची निवड होते, यावर आगामी काळातील विकासकामांची दिशा ठरणार असल्याने राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत.

तीनही मतदारसंघांचा समतोल साधण्याचा प्रयत्न झाल्यानंतर स्थायी समितीचे अध्यक्षपद चौथ्या नेतृत्वाला दिले जाणार की, याच तिन्ही मतदारसंघांपैकी एखाद्यालाच पुन्हा एक अतिरिक्त जबाबदारी दिली जाणार, याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. त्यामुळे सत्ताधारी पक्षाचा पुढील निर्णय कोणता असेल, याकडे महापालिकेतील सर्वांची नजर लागली आहे.

## महायुतीत असूनही रिपब्लिकन पक्षावर अन्याय; स्थायी समिती सभापतीपद द्या!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महापौर तसेच उपमहापौरपदी डावल्यानंतर महायुतीत असूनही रिपब्लिकन पक्षावर अन्याय होत असल्याची भावना शहराध्यक्ष तथा नगरसेवक कुणाल वाव्हळकर यांनी व्यक्त केली आहे. पुण्यात भाजपाने मोठ्या मनाने रिपाईला उपमहापौर पद देऊन युतीचा धर्म पाळला. त्याप्रमाणे आता पिंपरी चिंचवड मध्ये भाजपाने स्थायी समितीचे सभापती पद देऊन अन्याय दूर करावा अशी मागणी वाव्हळकर यांनी केली आहे.**





रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) हा लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये प्रामाणिकपणे भारतीय जनता पार्टी व महायुतीसोबत काम करत आला आहे. मात्र लोकसभा व विधानसभेमध्ये कोणतीही जागा मिळालेली नसतानाही आंबेडकरी समाज आजही महायुतीसोबत ठामपणे उभा आहे. असे असताना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये रिपब्लिकन पक्षावर होत असलेल्या दुर्लक्षामुळे पक्षाच्या गोटात तसेच आंबेडकरी समाजात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला १२८ पैकी पाच जागा देण्यात आल्या होत्या. त्यापैकी प्रभाग क्रमांक २५ मधून कुणाल वाव्हळकर (शहराध्यक्ष) आणि प्रभाग क्रमांक १६ मधून धर्मपाल तंतरपाळे हे दोन उमेदवार निवडून आले. पुणे महानगरपालिकेत रिपब्लिकन पक्षाला उपमहापौर पद देण्यात आले असतानाही, पिंपरी-चिंचवड शहरातील नेते व येथील आमदारांना याचा विसर पडल्याची भावना व्यक्त होत आहे.

महायुतीमध्ये प्रामाणिक भूमिका निभावूनही रिपब्लिकन पक्षाला योग्य सन्मान मिळत नसल्याने पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या पार्श्वभूमीवर येणाऱ्या स्थायी समितीच्या सभापतीपदाचा मान रिपब्लिकन पक्षाला द्यावा, अशी ठाम मागणी शहराध्यक्ष, नगरसेवक कुणाल वाव्हळकर यांनी केली आहे. महायुतीने आंबेडकरी समाजाची भावना लक्षात घेऊन न्याय मिळवून भूमिका घ्यावी, अशी मागणी होत आहे.

# ‘काळा घोडा फेस्टिव्हल’ मध्ये पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळेचा प्रथम क्रमांक.!

## थेरगाव मनपा शाळेचे “मानवी विचारांचे रोलरकोस्टर” ठरले लक्षवेधी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मुंबई येथील प्रतिष्ठित काळा घोडा फेस्टिव्हल २०२६ अंतर्गत आयोजित चिल्ड्रन्स इन्स्टॉलेशन विभागासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या चार शाळांची निवड झाली होती. या विभागातील विजेत्या शाळांची यादी नुकतीच जाहीर करण्यात आली असून त्यामध्ये महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण प्राथमिक कन्या शाळा, थेरगाव या शाळेला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. या प्रतिष्ठित स्पर्धेत पहिल्यांदाच महापालिकेच्या शाळेला प्रथम पारितोषिक मिळाले आहे.**



पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त ममता शिंदे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर तसेच कला नोडल अधिकारी श्रीकांत चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.

थेरगाव शाळेतील विद्यार्थ्यांनी “मानवी विचारांचे रोलरकोस्टर” या विषयावर सादर केलेले इन्स्टॉलेशन परीक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेणारे ठरले. टाकाऊ वस्तूंचा सर्जनशील वापर करून मानवी मनाचा वेग, भावनांची गुंतागुंत आणि आत्मसंयम यांचे प्रभावी प्रतीकात्मक दर्शन या मॉडेलमध्ये घडवण्यात आले आहे. हे मॉडेल सर्वोत्तम ठरले असून थेरगाव शाळेला प्रथम क्रमांक मिळाला आहे. या यशामुळे मनपा शाळांनी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रासह विविध राज्यांतील अनेक नामांकित व खासगी शाळांनी सहभाग नोंदवला होता.

अशा स्पर्धात्मक वातावरणात महापालिकेच्या शाळेने मिळवलेले हे यश विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता, कल्पकता आणि मार्गदर्शनाची पावती देणारे ठरले आहे.

### मुंबईत मनपा शाळेची मान उंचावली!

- मुंबई येथे आयोजित प्रतिष्ठित काळा घोडा फेस्टिव्हल २०२६ अंतर्गत झालेल्या चिल्ड्रन्स इन्स्टॉलेशन विभागात पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण प्राथमिक कन्या शाळा, थेरगाव हिने प्रथम क्रमांक पटकावला. “मानवी विचारांचे रोलरकोस्टर” या विषयावर सादर केलेल्या इन्स्टॉलेशनने परीक्षकांचे विशेष लक्ष वेधले.
- टाकाऊ वस्तूंच्या सर्जनशील वापरातून मानवी मनातील वेग, भावना व आत्मसंयम यांचे प्रभावी प्रतीकात्मक दर्शन घडवण्यात आले. पहिल्यांदाच महापालिकेच्या शाळेला या प्रतिष्ठित स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले असून, हे यश विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व गुणवत्तेचे द्योतक ठरले आहे.



# साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही भरता येणार मालमत्ता कर!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून शहरात मालमत्ता कर वसुलीची मोहीम सुरू आहे. चालू आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आता केवळ दोन महिने शिल्लक राहिले आहेत. ही बाब लक्षात घेऊन नागरिकांना कर भरण्यास अधिक सुविधा मिळाव्यात, यासाठी महापालिकेचे मुख्य कार्यालय तसेच शहरातील १८ विभागीय कर संकलन कार्यालये शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहेत.**




> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व संकलन विभागाच्या वतीने विविध माध्यमांतून नागरिकांना मालमत्ता कर भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. नागरिकांसाठी ऑनलाईन कर भरणा करण्याची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. शहरातील करदात्यांनी मालमत्ता कराचा भरणा करून शहराच्या विकासामध्ये हातभार लावावा.
>
> **– तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**




पिंपरी चिंचवड शहरातील मालमत्ताधारकांसाठी कर भरण्यासाठी १८ विभागीय कर संकलन कार्यालये कार्यान्वित असून, या ठिकाणी तसेच ऑनलाईन पद्धतीने कर भरण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. कर संकलन विभागाच्या वतीने थकबाकीदारांविरोधात कठोर कारवाई सुरू असून, थकबाकीदारांवर मालमत्तांची जप्ती करणे तसेच नळ कनेक्शन खंडित करण्याच्या कारवाया केल्या जात आहेत. कारवाई टाळण्यासाठी नागरिकांनी आपला थकीत मालमत्ता कर वेळेत भरावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

> सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी तसेच शनिवार आणि रविवार या कालावधीत सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत सर्व १८ विभागीय कर संकलन कार्यालयांतील कॅश काउंटर सुरू असणार आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी कर भरण्याची वेळ वाढविण्यात आली असून, दिनांक ३१ मार्च २०२६ पर्यंत ही सुविधा उपलब्ध असणार आहे. या सुविधेचा नागरिकांनी लाभ घ्यावा.
>
> **– सचिन पवार, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# प्रभागात विकासकामांना गती देण्यासाठी नगरसेवक शत्रुघ्न काटे "ॲक्शन मोड"वर!

## पिंपळे सौदागर- रहाटणीमध्ये भाजपाचा पायाभूत सोयी-सुविधा सक्षमीकरणाचा संकल्प

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपळे सौदागर–रहाटणी प्रभाग क्रमांक २८ मध्ये विविध विकासकामांचा सखोल आढावा घेण्यासाठी तिन्ही नगरसेवकांची मॅरेथॉन बैठक पार पडली. निवडणुकीपूर्वी नागरिकांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी नगरसेवक शत्रुघ्न काटे, नगरसेविका अनिताताई काटे व नगरसेविका कुंदाताई भिसे हे पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये असून, विकासकामांना गती देण्यासाठी पालिका यंत्रणेला थेट धारेवर धरले.**



> "प्रभाग २८ मधील नागरिकांना दिलेले प्रत्येक आश्वासन पूर्ण होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही. विकासकामांमध्ये कोणतीही दिरंगाई, हलगर्जीपणा किंवा निकृष्ट दर्जा खपवून घेतला जाणार नाही. पालिका यंत्रणेने ठरलेल्या कालमर्यादित कामे पूर्ण करावीत, अन्यथा कठोर कारवाई केली जाईल. नागरिकांच्या सोयीसाठी आणि प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही सातत्याने रस्त्यावर उतरून पाठपुरावा करत राहू."
>
> – शत्रुघ्न काटे,
> शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा.

या आढावा बैठकीदरम्यान प्रभागातील रस्ते दुरुस्ती, ड्रेनेज व्यवस्था, पाणीपुरवठा, विद्युत विभाग, आरोग्य सेवा, स्ट्रीट लाईट्स तसेच उद्यानांच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. काही कामांमध्ये होत असलेल्या दिरंगाईबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत नगरसेवकांनी संबंधित पालिका अधिकाऱ्यांना जाब विचारला आणि ठराविक कालमर्यादित कामे पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

तिन्ही नगरसेवकांनी सुरू असलेल्या विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करून कामांच्या गुणवत्तेबाबत व प्रगतीबाबत सखोल आढावा घेतला. नागरिकांना होणाऱ्या अडचणी तातडीने दूर करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे स्पष्टपणे बजावण्यात आले.

विकासकामांमध्ये कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, तसेच नागरिकांना दिलेली आश्वासने वेळेत पूर्ण करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असा ठाम संदेश या बैठकीतून देण्यात आला. या पाहणी दौऱ्यास अनिताताई काटे, कुंदाताई भिसे, जयनाथशेठ काटे, संजयशेठ भिसे, संदिपशेठ काटे यांच्यासह संबंधित विभागांचे पालिका अधिकारी व कामांचे कंत्राटदार उपस्थित होते.

# प्रियदर्शनी स्कूलचे शिक्षक गोवा फेस्टिव्हलचे परीक्षक

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथील नामांकित ATD विषयाचे शिक्षक श्री. प्रदीप सोलंकी यांना गोवा स्केटिंग फेस्टिव्हल २०२६ मध्ये परीक्षक (JUDGE) म्हणून आमंत्रित करण्यात आल्याची घोषणा करताना शाळेला अभिमान वाटतो. हा प्रतिष्ठित क्रीडा महोत्सव मडगाव , गोवा येथे पार पडला.**

### प्रियदर्शनी स्कूलचा गौरव...

- या निमंत्रणामुळे केवळ श्री. सोलंकी यांनाच नव्हे तर प्रियदर्शनी स्कूल, मोशी यांनाही मोठा गौरव मिळाला असून, शाळेची दर्जेदार क्रीडा व्यावसायिक घडविण्याची बांधिलकी अधोरेखित झाली आहे. शाळेचे व्यवस्थापन, प्राचार्य, शिक्षकवृंद व विद्यार्थी यांनी श्री. प्रदीप सोलंकी यांचे या उल्लेखनीय यशाबद्दल अभिनंदन केले असून, त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.




Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE

गोवा स्केटिंग फेस्टिव्हल २०२६ हा एक उत्साही व स्पर्धात्मक राष्ट्रीय स्तरावरील स्केटिंग महोत्सव असून, देशभरातील उत्कृष्ट स्केटिंग खेळाडूंनी यात सहभाग नोंदवला. SPORTSLUP INDIA यांच्या वतीने आयोजित या महोत्सवात आंतरराष्ट्रीय स्पर्धासाठी निवड चाचण्यांचा समावेश होता. स्पीड व फ्रीस्टाईल अशा विविध गटांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या. तरुण तसेच अनुभवी खेळाडूंना आपले कौशल्य सादर करण्यासाठी हा कार्यक्रम एक उत्तम व्यासपीठ ठरला. हा महोत्सव ३१ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पार पडला.

श्री. प्रदीप सोलंकी यांची परीक्षक म्हणून निवड होणे हे स्केटिंग व क्रीडा शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या तज्ज्ञतेचे, समर्पणाचे आणि उत्कृष्ट कार्याचे द्योतक आहे. त्यांच्या




न्याय्य निर्णयक्षमता, तांत्रिक ज्ञान आणि व्यावसायिक दृष्टिकोनाचे आयोजक व सहभागी खेळाडूंनी विशेष कौतुक केले.

# शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अजित पवारांना श्रद्धांजली!

## आठवणींचा उजाळा: पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्यावतीने शोकसभेचे आयोजन

महाईन्यूज । पुणे

**महाराष्ट्र राज्याचे कार्यतत्पर उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अजितदादा पवार साहेब यांना पुण्यातील शैक्षणिक संस्थांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यासाठी बालगंधर्व रंगमंदिरात पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्यावतीने मराठवाडा मित्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष भाऊसाहेब जाधव यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेस शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.**

### शिक्षण क्षेत्राला दादांमुळेच प्रोत्साहन : मान्यवरांच्या भावना

शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष एस. के. जैन यांनी पिंपरी चिंचवडचा विकास दादांमुळेच झाला. परदेशी शिक्षण संस्थांच्या आव्हान पेलण्यासाठी दादा सारखे दूरदृष्टीचे सक्षम नेतृत्व होते. असे मत व्यक्त केले.स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांनी शिक्षण क्षेत्राला मार्गदर्शक होते. दादांनी शिक्षण क्षेत्रात केलेले काम लोकांना माहीत नाही. शिक्षण क्षेत्रात गुणवत्तेवर भर देणारे दादा अशी भावना व्यक्त केली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी अजित दादा महाराष्ट्राचे ब्रँड नेते. शिकण्यासाठी पायाभूत सोयीसुविधावर भर दिला. महाराष्ट्राच्या अर्थ संकल्पात शिक्षणासाठी भरीव तरतूद करणारे अर्थ मंत्री होते. असे मत व्यक्त केले. मगरपट्टा सिटीचे संचालक सतीश मगर यांनी बहुजन समाजातील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पायाभूत सुविधा सोयीसुविधा उत्तम दर्जाच्या पुरविणे यावर त्यांचा भर होता. असे सांगितले.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव संदीप कदम यांनी अजित दादांनी शेवटच्या श्वासापर्यंत लोकांच्या कल्याणासाठी काम केले. समाजासाठी मोठे काम करणाऱ्या महापुरुषांच्या अल्पायुष्य लाभले त्या प्रमाणे दादांनाही अल्पायुष्य लाभले. दादांच्या आचार विचाराप्रमाणे आपणही काम केले पाहिजे तीच खरी आदरांजली ठरेल. असे सांगितले. रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी दादांचे शिक्षण क्षेत्रातील योगदानाचे उत्तम उदाहरण म्हणजे बारामतीची विद्याप्रतिष्ठान आहे. राजकीय नेता कसा याचे उदाहरण म्हणून अजित दादा पवार कायम स्मरणात राहतील, असे सांगितले.



या प्रसंगी अतिरिक्त जिल्हाधिकारी सतीश राऊत, एमआयटी शिक्षण संस्थेचे राहुल कराड, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र - कुलगुरू डॉ. पराग काळकर, एमकेसीएलचे संचालक डॉ. विवेक सावंत, शिरूर शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार निकम, आचार्य अत्रे प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते, फ्लेम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जगदीश कदम, अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे सचिव प्रमिला गायकवाड, माजी सहायक शिक्षण आयुक्त अनिल गुंजाळ, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ, के. जे. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष के. जे. जाधव, तंत्र शिक्षण संचालयाचे धनपाल कांबळे, माजी आमदार विलास लांडे, पुरंदर तालुका शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष सतीश उरसळ, डेक्कन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आबा राऊत, प्रवरा शिक्षण मेडिकल संस्थेचे कुलगुरू डॉ. व्ही. एन.भगरे, भारती विद्यापीठाचे सचिव डॉ.महादेव सगरे, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन बाबासाहेब शिंदे, लोकमतचे संपादक संजय आवटे, बी.एम.सी.सी.चे प्रा.प्रशांत साठे,पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे आजीव सदस्य जे. एम. डुंबरे, शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एम. जी. ताकवले, शिवाजी मराठा शिक्षण संस्थेचे गायकवाड, सईबाई स्मारक विश्वस्त समितीचे सदस्य संग्राम कोंडे यांनी भावना व्यक्त केल्या. वि. दा. पिंगळे यांनी सूत्रसंचालन केले.

या प्रसंगी आमदार चेतन तुपे, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, खजिनदार ॲड. मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार, सहसचिव (प्रशासन) ए. एम. जाधव डॉ. शंतनू जगदाळे, प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे , डॉ. धोंडीराम पवार, प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, प्राचार्य संगीता जगताप यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दादांचे काम कायम स्मरणात राहील...

प्रोग्रेसिव्ह शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे :यांनी दादांना शिक्षण क्षेत्रात रस होता. संस्था चालकांसमोर प्रश्न समजवून घेऊन तो कसा सोडवायचा हे त्यांना माहीत होते. अजितदादा यांच्या नावाने विद्यापीठात अध्यासन सुरु करावे. असे सुचवले. शोकसभेचे अध्यक्ष मराठवाडा मित्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष भाऊसाहेब जाधव यांनी अजित दादांच्या जाण्याने महाराष्ट्र भरातील लोकांना जे दुख झाले आहे ते खूप मोठे आहे. खेड्यापाड्यातील सामान्य माणूस दुख व्यक्त करत आहे. 'कामाचा माणूस' म्हणून दादांविषयी लोक भावना व्यक्त करत आहेत. दादांसारखा नेता पुन्हा होणे नाही. दादांनी लोकांसाठी जे काम केले आहे ते कायम स्मरणात राहील. असे मत व्यक्त केले.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाने भोसरीत शोककळा

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

**महाराष्ट्राच्या राजकारणातील कणखर नेतृत्व, विकासाभिमुख दृष्टिकोन आणि स्पष्टवक्तेपणासाठी ओळखले जाणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाने संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. या पार्श्वभूमीवर भोसरी परिसरात त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी पीसीएमटी चौकात शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.**






या शोकसभेला नागरिक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. सभास्थळी दिवंगत अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मौन पाळण्यात आले. यावेळी उपस्थितांचे डोळे अश्रूंनी भरून आले होते. अनेकांनी आपल्या भावना व्यक्त करत अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला. "दादा म्हणजे केवळ नेता नव्हते, तर सामान्य माणसासाठी लढणारे खंबीर नेतृत्व होते," अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

या शोकसभेत माजी आमदार विलास लांडे, पंडित गवळी, संतोष लांडगे, दत्तोबा लांडगे, सखाराम डोळस, विजय फुगे, वसंत लोंढे, सतीश फुगे, नगरसेवक विराज लांडे, भीमाबाई फुगे, सुरेखा लोंढे, प्रियांका बारसे, सुरज लांडगे, अभिराज गव्हाणे, अमोल डोळस, भानुदास फुगे आदी मान्यवर उपस्थित होते.

**अजितदादा अमर रहे...**

यावेळी वक्त्यांनी अजित पवार यांच्या राजकीय वाटचालीचा आढावा घेतला. सिंचन, पायाभूत सुविधा, उद्योग, शिक्षण आणि शहरी विकासासाठी त्यांनी घेतलेले निर्णय आजही राज्याच्या प्रगतीचा पाया असल्याचे सांगण्यात आले. कार्यकर्त्यांशी थेट संवाद, अधिकाऱ्यांवर असलेली पकड आणि निर्णयक्षम नेतृत्व यामुळे ते सर्वसामान्यांमध्ये लोकप्रिय होते, असे मत व्यक्त करण्यात आले. शोकसभेच्या शेवटी 'अजित दादा अमर रहे'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. उपस्थितांनी त्यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करत त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन सामाजिक कार्य सुरू ठेवण्याचा संकल्प केला. अजित पवार यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून निघणारी असल्याची भावना शोकसभेतून व्यक्त झाली.